Anekant Education Society's

# TULJARAM CHATURCHAND COLLEGE

of Arts, Science & Commerce, Baramati

**Department of Sociology**

दि.२३/०२/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती

विषय: नेत्ररोग तपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर दि. २३/०२/२०२३ अहवाल....

महोदय,

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये समाजशास्त्र विभाग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती व राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA)आणि जतन फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नेत्ररोग तपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर दि. २३/०२/२०२३ आयोजित करण्यात आले होते. या शिबिरासाठी मा. रवींद्र झेंडे, जतन फाउंडेशन, कार्यकारी संचालक व एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल, मोहम्मदवाडी, पुणे उपस्थित होते. सध्याच्या काळात माणसाच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्या माणसाचे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामधून अनेक आरोग्याच्या समस्या डोके वर काढत आहे. त्यामध्ये सध्या डोळयाची समस्या एक गंभीर समस्या आहे. कारण माणसाचा डोळा हा अतिशय संवेदनशील अवयव आहे. त्यामुळे डोळयाची काळजी घेणे आवश्यक आहे. असे मत जतन फाउंडेशनचे कार्यकारी संचालक मा. रवींद्र झेंडे यांनी व्यक्त केले.

समाजशास्त्र विभाग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आणि जतन फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने व एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल, मोहम्मदवाडी, पुणे तसेच भोई समाज बांधव, कृषी उत्पन्न बाजार समिती भिगवन यांच्या

सहकार्याने डॉ. ललीतकुमार गोखले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'मोफत नेत्ररोग तपासणी, चष्मा वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जतन फाउंडेशनचे कार्यकारी संचालक रवींद्र झेंडे बोलत होते. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. विनायक लष्कर, प्रा. नितीन चव्हाण, तत्वज्ञान विभागाचे विभागप्रमुख प्रा. कृष्णात नगरे, डॉ. अजम कुरेशी, मा. भरत मल्लाल (दै.पुढारी वृत्तपत्राचे पत्रकार), मा. माऊली नगरे, मा.नितीन इरिचे यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. विनायक लष्कर यावेळी म्हणाले की, इतर आजाराकडे लोक गांभीर्याने पाहतात. परंतु डोळयाच्या आजराविषयी मात्र तितके गांभीर्य नसते. त्याच्या विविध कारणांपैकी आर्थिक परिस्थिती हे एक करण आहे. त्यामुळे ज्या लोकांना अशा मदतीची गरज आहे. हा हेतु लक्षात घेऊन आजचा उपक्रम घेतला आहे. असे मत व्यक्त केले. या मोफत नेत्ररोग तपासणी, चष्मा वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरा मध्ये भटक्या विमुक्त जाती जमातीतील, इतर समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल, वंचित समूहातील २०० लोकांची मोफत नेत्र तपासणी करून मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. तसेच 30 लोकांना मोतीबिंदू असल्याचे तपासणी मधून नवीन रुग्ण आढळून आले. या रुग्णाची मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे. या उपक्रमाला कुंभारगाव इंदापुरचे सरपंच सौ. उज्वला द. परदेशी, तक्रारवाडी भिगवणचे माजी सरपंच गणेश वायदांडे यांनी विशेष भेट दिली.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्रा. विनायक लष्कर
समाजशास्त्र विभागप्रमुख


Azadi Ka Amrit Mahotsav
अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,
तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती
आणि
जतन फाउंडेशन पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने
नेत्ररोग त
आणि च
शिबीर
दि.२३/०२/२०२
वेळ :-
दु.०२.०० वा
ठिकाण :- न
मार्केट, भिगवण,
जि.पुणे
Latitude: 18.295709
Longitude: 74.757327
Elevation: 511.63m
Accuracy: 9.6m
Time: 23-02-2023 10:31:08


JATAN FOUNDATION FOR INCLUSION
पुरस्कृत
डॉ. ललितकुमार गोखले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ
जतन फाऊंडेशन आयोजित
मोफत नेत्रतपासणी
मोफत चष्मेवाटप शि
आणि
मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रि
दि. २३ फेब्रुवारी २०२३ सकाळी
कृषीउत्पन्न बा
अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,
तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती
आणि
जतन फाउंडेशन पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने
नेत्ररोग तपासणी आणि चष्मावाटप शिबीर
दि.२३/०२/२०२३
वेळ :- स.०८.०० ते दु.०२.०० वा
ठिकाण :- नवीन फिश मार्केट, भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे
संयोजक
समाजशास्त्र विभाग
तुळजाराम चतुरचंद महाविद्याल
बारामती.
प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.
Latitude: 18.295838
Longitude: 74.757384
Elevation: 516.99m
Accuracy: 3.2m
Time: 23-02-2023 12:06:04